**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

ग्राहक तक्रार क्र. १७४,१७७,१८७,१९९/२००८/ दिनांक :

**ग्राहक तक्रार क्र. १७४**

श्री. देशमाने टेक्स्टाईल्स,
४४०, रविवार पेठ, माधवनगर, अर्जदार
जिल्हा सांगली.

**ग्राहक तक्रार क्र. १७७/२००८**

काराणी टेक्स्टाईल्स,
१५१, मेन रोड, माधवनगर, अर्जदार
जिल्हा सांगली.

**ग्राहक तक्रार क्र. १८७/२००८**

संतोष टेक्स्टाईल्स,
प्रो.प्रा. आप्पासो शंकर नवाळे,
५१४, रविवार पेठ, माधवनगर, अर्जदार
जिल्हा सांगली.

**ग्राहक तक्रार क्र. १९९/२००८**

रत्नाकर टेक्स्टाईल्स,
१५१/३, मेन रोड, माधवनगर, अर्जदार
जिल्हा सांगली.

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, विश्रामबाग,
सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरुध्द पक्षकार
शहर विभाग, सांगली

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उपविभागीय कार्यालय, माधवनगर,
जि. सांगली

**<u>कोरम</u>** :– १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

श्री. जावेद मोमीन, तक्रारदार प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार



**न्यायनिर्णय**

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,ग्रा.त.नि.मंच यांचेतर्फे दिनांक १०.११.२००८

प्रस्तुत चारही तक्रार प्रकरणामध्ये अर्जदार जरी वेगळे असले तरी वि.प. हे चारही प्रकरणामध्ये एकच आहेत. तसेच या चारही प्रकरणामध्ये यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळणे संबंधात विषय आहे. तसेच या चारही तक्रार अर्जदारांचे प्रतिनिधी हे श्री. जावेद मोमीन, इचलकरंजी हेच आहेत. सबब न्यायाच्या दृष्टीने ही चारही प्रकरणें एकत्रित एकाच न्यायनिर्णयामध्ये निकाली काढणे या मंचास योग्य वाटत आहे. तसेच या एकत्रित न्यायनिर्णयामुळे कोणत्याही पक्षकारास कोणतीही बाधा होवू शकत नाही. म्हणून एकत्रितरित्या न्याय निर्णय देण्यात येत आहे.

सदरील चारही तक्रार अर्जदार यांनी ' क्ष ' नमुन्यामध्ये अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळणे बाबत अर्ज केले होते. परंतु त्याचा निकाल लागणे अगोदरच, त्यांचा विद्युत पुरवठा वितरण कंपनीकडून खंडीत होवू शकेल या भितीने अशा चारही यंत्रमागधारक तक्रार अर्जदारांनी दि. ३.७.२००८ रोजी या मंचाकडे ' अ ' नमुन्यामध्ये अर्ज दाखल केले आहेत. या चारही अर्जामध्ये मुख्यत: जी तक्रार केली आहे ती अशी की, यंत्रमाग संजीवनी योजना महाराष्ट्र सरकारने लागू केली असतांनाही व त्याप्रमाणे दि. १.३.२००४ अखेर ग्राहकाकडे असलेल्या थकबाकीपैंकी ५०% रकमेस सूट देण्याची योजना लागू असतांनाही वितरण कंपनीने सदर योजनेचा लाभ अर्जदारांना दिला नाही व त्यांचे नांवे पोकळ थकबाकी दर्शविलेली आहे. असे असतांनाही व अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल असतांनाही वितरण कंपनीने विद्युत पुरवठा खंडीत करणे बाबत १५ दिवसांची नोटीस दिलेली आहे. सबब सदरचा अर्ज या मंचाकडे न्याय मिळणेसाठी दाखल केलेला आहे. या चारही प्रकरणामध्ये प्रकरणांचा निकाल होईपर्यंत वितरण कंपनीने विद्युत पुरवठा खंडीत करु नये म्हणून अंतरीम आदेश मिळणे बाबत अर्ज दिला. त्याप्रमाणे या मंचाचे त्यावेळचे सदस्यद्वय यांनी ता. १५.७.२००८ रोजी अंतरीम आदेश दिला.

तसेच पुढे दि. ११.८.२००८ रोजी देखील अंतरीम आदेश देवून विद्युत पुरवठा खंडीत करणे बाबत प्रतिबंद केला. पुढे वि.प.स अर्जदारांचे तक्रारीबाबत मांडणेसाठी संधी दिली. त्याप्रमाणे वितरण कंपनीतर्फे लेखी म्हणणे तसेच ग्राहकांचे सीपीएलचे उतारे दाखल केले. अर्जदारांनी देखील या मंचाच्या आदेशा प्रमाणे सन २००४ पासून पुढे भरणा केलेल्या रकमेबाबत तपशिल दिला. तद्नंतर अर्जदारातर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री. जावेद मोमीन यांचा युक्तीवाद व म्हणणे सविस्तरपणे सांगली कॅम्प तसेच कोल्हापूर कॅम्प येथे मंचाने ऐकले. या उलट, वितरण कंपनीतर्फे श्री. पी.जी. जेधे, कार्यकारी अभियंता, श्री. पाडळकर, उप कार्यकारी अभियंता, विभागीय लेखापाल यांनी त्यांची बाजू मांडली. वितरण कंपनीतर्फे ग्राहकांचे सीपीएल सन २००० ते २००७ पर्यंत देण्यात आलेले आहे. तसेच सीपीएलमध्ये विद्युत वापरा बाबत लावलेल्या बिलासंबंधात महाराष्ट्र सरकारने दिलेल्या सवलतीचे दरांचा उल्लेख नसलेने त्या बाबत सवलतींच्या दराने होणारा वीज आकार तसेच ग्राहकाने भरलेली रक्कम या बाबत ऑडीटेड स्टेटमेंटस् सन २००० ते २००५ पर्यंत दाखल केलेली आहेत.



वरील सर्व बाबींचा विचार करता व दोन्ही बाजूंचे म्हणणे विचारात घेवून यंत्रमाग संजीवनी योजने संबंधातील दि. १२.७.२००४ चे परिपत्रमकतसेच तद्नंतर थकबाकी भरणेसाठी मुदतवाढी बाबतची परिपत्रके ज्यामध्ये अखेरचे मार्च २००५ पर्यंत थकबाकी व चालू बील भरणे बाबत उल्लेख आहे अशीच परिपत्रके या मंचाने अवलोकन केलेली आहेत. या सर्वांचा विचार करता व तक्रार अर्जदारांची मागणी विचारात घेता, खालील मुद्दे या चारही प्रकरणामध्ये आमच्या निष्कर्षास उद्भवतात.

१) ३१ मार्च २००४ पर्यंत सदरील चारही तक्रार अर्जदारांचे वीज बिलापोटी थकबाकी होती काय ?
उत्तर : नाही

२) सदरील चारही अर्जदारांना यंत्रमाग संजीवनी योजनेची सवलत मिळण्याचा प्रश्न उदभवतो काय ?
उत्तर : नाही

३) आदेश ?
उत्तर : अखेरच्या आदेशाप्रमाणे

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>तक्रार अर्ज १७४/२००८</u>**

या चारही तक्रार अर्जदारापैंकी तक्रार अर्ज क्र. १७४/०८ मधील सीपीएलमध्ये दाखविण्यात आलेली सन २००० ची येणे बाकी तसेच त्यामध्ये दाखवलेली भरणा रक्कम तसेच तक्रार अर्जदाराने दि. २०.८.२००८ रोजी दाखविलेली भरणा रक्कम व वितरण कंपनीने दाखल केलेले सन २००० ते मे २००५ पर्यंतची ऑडीटेड स्टेटमेंटस् याचा विचार करता,

१) तक्रार अर्जदाराचे एप्रिल २००० मध्ये असलेली बाकी रु. ७६३.३५

२) मार्च २००४ अखेर अर्जदाराकडे असणारी बाकी (–) रु. ८१७९.७५

तसेच वरील भरणा रकमेचा विचार करता, मे. देशमाने टेक्स्टाईल यांचेकडे मार्च २००४ अखेर कोणतीही थकबाकी नव्हती. उलट, त्यांचीच जादा रक्कम रु. ८१७९.७५ वितरण कंपनीकडे जमा होती. ग्राहकातर्फे भरणा केलेल्या रकमेबाबत ग्राहक अथवा वितरण कंपनी यांचा कोणताही वाद नाही.

**<u>तक्रार अर्ज १७७/२००८</u>**

या चारही तक्रार अर्जदारापैंकी तक्रार अर्ज क्र. १७७/०८ मधील सीपीएलमध्ये दाखविण्यात आलेली सन २००० ची येणे बाकी तसेच त्यामध्ये दाखवलेली भरणा रक्कम तसेच तक्रार अर्जदाराने दि. २०.८.२००८ रोजी दाखविलेली भरणा रक्कम व वितरण कंपनीने दाखल केलेले सन २००० ते मे २००५ पर्यंतची ऑडीटेड स्टेटमेंटस् याचा विचार करता,

१) तक्रार अर्जदाराचे एप्रिल २००० मध्ये असलेली बाकी रु. ५६४.२५

२) मार्च २००४ अखेर अर्जदाराकडे असणारी बाकी (–) रु. १३९९४.८५

तसेच वरील भरणा रकमेचा विचार करता, मे. काराणी टेक्स्टाईल यांचेकडे मार्च २००४ अखेर कोणतीही थकबाकी नव्हती. उलट, त्यांचीच जादा रक्कम रु. १३९९४.८५ वितरण कंपनीकडे जमा होती. ग्राहकातर्फे भरणा केलेल्या रकमेबाबत ग्राहक अथवा वितरण कंपनी यांचा कोणताही वाद नाही.



**<u>तक्रार अर्ज १८७/२००८</u>**

या चारही तक्रार अर्जदारापैंकी तक्रार अर्ज क्र. १८७/०८ मधील सीपीएलमध्ये दाखविण्यात आलेली सन २००० ची येणे बाकी तसेच त्यामध्ये दाखवलेली भरणा रक्कम तसेच तक्रार अर्जदाराने दि. २०.८.२००८ रोजी दाखविलेली भरणा रक्कम व वितरण कंपनीने दाखल केलेले सन २००० ते मे २००५ पर्यंतची ऑडीटेड स्टेटमेंटस् याचा विचार करता,

१) तक्रार अर्जदाराचे एप्रिल २००० मध्ये असलेली बाकी रु. ७६३.३५

२) मार्च २००४ अखेर अर्जदाराकडे असणारी बाकी (–) रु. २९३१.६५

तसेच वरील भरणा रकमेचा विचार करता, मे. संतोष टेक्स्टाईल यांचेकडे मार्च २००४ अखेर कोणतीही थकबाकी नव्हती. उलट, त्यांचीच जादा रक्कम रु. २९३१.६५ वितरण कंपनीकडे जमा होती. ग्राहकातर्फे भरणा केलेल्या रकमेबाबत ग्राहक अथवा वितरण कंपनी यांचा कोणताही वाद नाही.

**<u>तक्रार अर्ज १९९/२००८</u>**

या चारही तक्रार अर्जदारापैंकी तक्रार अर्ज क्र. १९९/०८ मधील सीपीएलमध्ये दाखविण्यात आलेली सन २००० ची येणे बाकी तसेच त्यामध्ये दाखवलेली भरणा रक्कम तसेच तक्रार अर्जदाराने दि. २०.८.२००८ रोजी दाखविलेली भरणा रक्कम व वितरण कंपनीने दाखल केलेले सन २००० ते मे २००५ पर्यंतची ऑडीटेड स्टेटमेंटस् याचा विचार करता,

३) तक्रार अर्जदाराचे एप्रिल २००० मध्ये असलेली बाकी रु. ५६६.७४

४) मार्च २००४ अखेर अर्जदाराकडे असणारी बाकी (–) रु. १७२२.५६

तसेच वरील भरणा रकमेचा विचार करता, मे. रत्नाकर टेक्स्टाईल्स यांचेकडे मार्च २००४ अखेर कोणतीही थकबाकी नव्हती. उलट, त्यांचीच जादा रक्कम रु. १७२२.५६ वितरण कंपनीकडे जमा होती. ग्राहकातर्फे भरणा केलेल्या रकमेबाबत ग्राहक अथवा वितरण कंपनी यांचा कोणताही वाद नाही.

वरील चारही प्रकरणामध्ये दाखल केलेली ऑडीटेड स्टेटमेंटस् प्रमाणे ज्यामध्ये महाराष्ट्र सरकारच्या आदेशा प्रमाणे सवलतीच्या दराने वीज आकारणी केलेली आहे, त्याप्रमाणे मार्च २००४ अखेर कोणतीही येणे रक्कम दिसून येत नही. सबब अशा वरील चारपैंकी कोणत्याही ग्राहकास महाराष्ट्र सरकारने दि. १२.७.२००८ रोजी काढलेल्या परिपत्रकाप्रमाणे यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळणेचा प्रश्नच उद्भवत नाही.

ज्या कोणा ग्राहकाची मार्च २००४ अखेर थकबाकी आहे व असा ग्राहक कांही कारणाने थकबाकी भरु शकत नव्हता, अशांना मदत म्हणून मार्च २००४ रोजी असणाऱ्या थकबाकी बिलामध्ये ५०% सवलत दि. १२.७.२००४ चे परिपत्रकाप्रमाणे देण्यात आलेली होती. त्या परिपत्रकातील अटी व शर्तीप्रमाणे सदरील चारही ग्राहक बसत नसलेने त्या कोणालाही कोणत्याही प्रकारची सवलत मागणेचा अधिकार प्राप्त होत नाही व या मंचाकडून अशी सवलत देण्याचा प्रश्न उदभवत नाही. सबब आम्ही वरील दोन्ही प्रश्नांबाबत आमची उत्तरे दिलेली आहेत.

वरील प्रमाणे कारणमिमांसेचा विचार करता, सदरील चारही अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. तसेच या चरही अर्जामध्ये अन्य अर्जासोबत संयुक्तरित्या दि. १५.७.२००८ व ११.८.२००८ रोजी त्यांचे कडील बिलांचे वसुली बाबत देण्यात आलेले स्थगनादेश उठविणे आवश्यक आहेत. सबब खालील प्रमाणे आदेश –



## आदेश :

१) अपील क्र. १७४/०८, १७७/०८, १८७/०८ व १९९/०८ फेटाळण्यात येत आहेत.

२) या चारही अर्जाचे खर्चाबाबत आदेश नाहीत.

३) सदरचे चारही तक्रार अर्जाबाबत दिनांक १५.७.२००८ व दि. ११.८.२००८ रोजी दिलेले तात्पुरते स्थगनादेश उठविण्यात येत आहेत.

४) वितरण कंपनीला तक्रार अर्जदाराकडे असणारी येणे बाकी नियमाप्रमाणे वसुलीची मुभा आहे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : १०.११.२००८

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..